**५२) ठेवी :**

१) बँकेस सहकार कायदा व नियम तसेच रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार आणि संचालक मंडळाच्या मंजूरीने त्या त्या वेळेच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या व्याजदराने ठेवू स्विकारता येतील.

२) अशा ठेवी या चालू खाती, बचत खाती, रिकरिंग खाती, पुर्नगुंतवणूक खाती अथवा एखाद्या विशिष्ट योजनेनुसार येणारी खाती इत्यादी प्रकारात स्विकारता येतील. परंतू अशी खाती स्विकारतांना के.वाय.सी. नियमावलीचे पालन करणे आवश्यक आहे.

३) बँकेच्या सर्व ठेवी विमा महामंडळ कायदा १९६१ नुसार सुरक्षित असतील आणि विमा महामंडळ कायद्यातील विविध तरतूदीनुसार त्या नियंत्रीत केल्या जातील.

४) अशी खाती उघडण्यासाठी व ती नियंत्रीत करणेसाठी बँकेस या संदर्भात रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्वे आणि आदेश यांचे पालन करणे आवश्यक आहे.

**५३) कर्ज व्यवहार :**

अ) सभासदांना खाली निर्देशित केल्याप्रमाणे विनातारण किंवा तारणापोटी अथवा संचालक मंडळाने मान्य केलेल्या इतर तारणांपोटी कर्जे/कॅश क्रेडीटस्/ओव्हरड्राफ्टस् मंजूर करता येतील. मात्र याबाबत रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी येणाऱ्या कर्ज व्यवहाराबाबतच्या आदेशाचे पालन करावे लागेल.

कर्जासाठी अर्ज करणाऱ्या सभासदांनी इतर नागरी सहकारी बँका अथवा पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थेकडून कर्जे घेतले नसलेसंबधी डिक्लेरेशन घेणेत येईल. जर कर्ज घेतले असलेचे नंतर उघडकीस आलेस त्यास कर्ज मागणी करणारा सभासद जबाबदार असून त्यास दिलेली कर्जाची सर्व रक्कम ताबडतोब एका रक्कमेने वसुलीस पात्र राहिल.

१) व्यक्तीगत तारण किंवा इतर सभासदांची जामिनकी/नाममात्र सभासदांची जामिनकी.

२) स्थावर अथवा जंगम मालमत्तेचे सहतारण (कोलॅटरल)

३) औद्योगिक माल,व्यापारी माल,शेती माल अगर इतर बाजारमुल्य असलेल्या वस्तू, मशिनरी यांचेवर ताबेगहाण, नजरगहाण व इतर प्रकारे बोजा निर्माण करुन.

४) सरकारी कर्जरोखे, विश्वस्त संस्थांचे कर्जरोखे, मान्यताप्राप्त कंपनीचे भाग, डिबेंचर्स व बँकेच्या मुदत ठेवी यांचे तारणावर.

५) विमा पॉलिसीचे तारणावर (सरेंडर व्हॅल्यू.विचारात घेऊन)

६) वखार पावतीचे तारणावर

७) सोन्या/चांदीचे दागिन्यांचे/लगडीच्या तारणापोटी

८) कोणत्याही इतर दृश्य तारणापोटी. उदा. वाहने